# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.जि.वाशिम
कॅम्प - मानोरा जि.वाशिम
दि.०९.०४.२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नांव | अॅन्टी करप्शन ब्युरो, वाशिम जि.वाशिम |
| २ | आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | ईतर लोकसेवक श्री.निलेश सुभाष राठोड, वय ४२ वर्ष व्यवसाय ग्राम रोजगार सेवक, ग्रामपंचायत बोरव्हा, पोस्ट कार्ली, ता.मानोरा जि.वाशिम रा.बोरव्हा, पोस्ट कार्ली, ता.मानोरा जि.वाशिम |
| ३ | अपराध घटला दिनांक वेळ | दि.०९.०४.२०२५ चे १४:०३ वा त १४:२२ वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/-रुपये |
| ५ | तडजोडीअंती मागणी केलेली लाच रक्कम | ४,०००/-रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ४,०००/-रुपये |
| ७ | घटना स्थळ | पंचायत समिती कार्यालय मानोरा परिसर |

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील तक्रारदार यांचे वडीलांचे नावे सिंचन विहीर मंजुर झाली असुन विहीरीच्या जागेची इंजिनियर साहेबां कडुन (पॅनल तांत्रिक अधिकारी कडुन) जिओ टॅगींग करण्या करिता ५००० /-रुपयेची लाच मागणी करित असल्याबाबत दि.०७.०४.२०२५ रोजी तक्रार दिली.

सदर तक्रारीची पडताळणी दि.०७.०४.२०२५ रोजी करण्यात आली असता पडताळणी कारवाई दरम्यान ईलोसे यांनी तक्रारदार यांना इंजिनीयर साहेब (पॅनल तांत्रीक अधिकारी) यांच्या कडुन वडीलांचे नावे मंजुर असलेल्या विहीरीचे जिओ टॅगींग करून देण्याकरीता पाच हजार रूपये लाचेची मागणी करून तडजोडअंती चार हजार रूपये स्विकारण्याची तयारी दर्शविली.

दि.०९.०४.२०२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान ईलोसे निलेश सुभाष राठोड, ग्रामरोजगार सेवक यांनी तक्रारदार यांच्या वडीलांच्या नावे मंजुर असलेल्या विहीरीचे जिओ टॅगींग इंजिनिअर (पॅनल तांत्रीक अधिकारी) कडुन करून देण्याकरीता पंचायत समिती मानोरा परीसरात तक्रारदार यांच्याकडुन ४०००/- रू. पंचासमक्ष स्विकारल्या वरुन ईलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादवरुन नमुद ईलोसे यांचे विरुध्द पोलीस स्टेशन मानोरा जि.वाशिम येथे कलम ७A भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री.मारुती जगताप, अपर पोलीस अधिक्षक श्री.सचिद्र शिंदे, ला.प्र.वि. अमरावती परीक्षेत्र अमरावती, श्री.बालाजी आर. तिप्पलवाड प्रभारी पोलीस उपअधिक्षक ला.प्र.वि. वाशिम यांचे मार्गदर्शनात सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्रीमती अलका एम गायकवाड, ला.प्र.वि., वाशिम जि.वाशिम तसेच पथकातील कर्मचारी सपोउपनि दुर्गादास जाधव, पोहेकॉ विनोद मारकंडे, योगेश खोटे, समाधान मोघाड, चापोहवा मिलींद चन्नकेशला यांनी केली.

शासकीय लोकसेवकाने खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, वाशिम दुरध्वनी क्रमांक ०७२५२/२३५९३३, टोल फ्रि.नं.१०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो वाशिम

A. Gaikwad

(अलका एम. गायकवाड)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.